# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date: 09 April 2024**

**Time 01.00 to 01.05 PM**

**Language Marathi**

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचं जागावाटपाचं सूत्र ठरलं असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागा लढवणार आहे. महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत आज जागावाटपाबाबत घोषणा करण्यात आली. या परिषदेला महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले आदी उपस्थित होते.

काँग्रेस पक्ष नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, उत्तर मध्य मुंबई, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक, उत्तर मुंबई या जागा लढवणार आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, दक्षिण अहमदनगर आणि बीड या जागा लढवणार आहे. तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशीम, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, दक्षिण मुंबई, ईशान्य मुंबई या जागा लढवणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला नवीन संवत्सर, गुढीपाडवा, चेटी चंड, नवरेह उगादि तसंच साजिबू चेईराओबा निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नवीन वर्ष सर्वांसाठी आनंद, समृद्धीचं जावं अशी कामना त्यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशाद्वारे केली आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर केलेल्या टिपण्णीबद्दल काँग्रेसनं निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवली आहे. ज्येष्ठ नेते सलमान खुर्शीद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं याबाबत नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लीम लीगचा ठसा आहे, या पंतप्रधान मोदी यांच्या विधानावर पक्षानं आक्षेप घेतला असून ही बाब गांभीर्यानं घेऊन कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडं काँग्रेसनं केली आहे.

****

सक्तवसुली संचालनालय ईडीनं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक विभव कुमार आणि आम आदमी पक्षाचे आमदार दुर्गेश पाठक यांची कथित मद्यधोरण घोटाळ्याप्रकरणी काल चौकशी केली. या प्रकरणी दोघांचा जबाबही नोंदवण्यात आला आहे.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित, गट – ब सेवा मुख्य परीक्षा – २०२३ या परीक्षेतील दुय्यम निबंधक श्रेणी–१, मुद्रांक निरीक्षक संवर्गाच्या एकूण ४९ पदांचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेमध्ये नाशिक जिल्ह्यातील भूषण निवृत्ती लांडगे हे अराखीव तसंच मागास वर्गवारीतून राज्यात प्रथम आले आहेत. तर महिला अराखीव गटातून सांगली जिल्ह्यातील गितांजली रविंद्रनाथ कोळेकर राज्यात प्रथम आल्या आहेत. या परीक्षेचा अंतिम निकाल आणि प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवारांचे गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

****

नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचं लेव्ही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, त्यामुळं न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत लिलाव सुरू करावेत असे आदेश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी काल व्यापाऱ्यांना दिले. मात्र, व्यापारी आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळं नाशिक जिल्ह्यातल्या बाजार समित्यांमध्ये यापुढेही काही दिवस लिलाव बंद राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, शेतकरी संघटनांनीच याप्रकरणी पुढाकार घेऊन लिलाव उद्यापासून पूर्ववत सुरू करण्यात येतील आणि शेतकरी संघटना शेतमालाचे लिलाव करेल असं म्हटलं आहे.

****

गुढी पाडवा, रमजान ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, राम नवमी हे सण एकापाठोपाठ आले असून, नागरिकांनी धार्मिक सलोखा आणि शांतता अबाधीत ठेवत एकात्मतेच्या भावनेनं हे सर्व सण उत्साहात साजरे करावेत असं आवाहन परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केलं आहे.  शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्ह्यात किंवा शहरात कोणतीही अप्रिय घटना घडल्यास पोलिस यंत्रणेला तात्काळ १ १ २ या क्रमांकावर माहिती द्यावी  असं आवाहन जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी यावेळी केलं.

****

हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्यानिमित्त बीड शहरात आज सकाळी बालाजी मंदिरापासून नववर्ष स्वागत फेरी काढण्यात आली.

****